REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 3 | DECEMBER - 2018

# पंचायत राज व महिला सशक्तीकरण एक चिकित्सक अध्ययन




डॉ. राधेश्याम ना. मानकर
कला व वाणिज्य महाविद्यालय, जवाहर नगर, भंडारा

## सारांश

प्रस्तुत अध्ययनात भंडारा जिल्ह्यातील जिल्हा परिषद व पंचायतसमिती सदस्य, जिल्हा परिषदेचे अधिकारी व कर्मचारी व गावातील विविध योजनांतर्गत लाभ घेतलेले लाभार्थी व ग्रामीण जनता यांचा अध्ययनविश्व म्हणून विचार करण्यात आला. जिल्हा परिषदेच्या २५ अधिकाऱ्यांची मते जाणून घ्यावयाची होती. परंतु जास्तीत जास्त अधिकाऱ्यांची मते जाणून घेणे महत्वाचे वाटल्याने अधिकाऱ्यांची मते जाणून घेण्यात आली. निवड केलेले अधिकारी हे राज्य शासनाचे अधिकारी आहेत. कर्मचाऱ्यांची निवड करतांना जे कर्मचारी विस्तार सेवांत कार्यरत आहेत, ज्यांचा प्रत्यक्ष ग्रामीण विकासाच्या कामाशी प्रत्यक्ष संपर्क येतो अशा जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावर विविध विभागांतर्गत काम करणारे विस्तार अधिकारी, कृषी अधिकारी, ग्रामसेवक, पर्यवेक्षण करणारे कर्मचारी इत्यादींचा समावेश करण्यात आला आहे.

## प्रस्तावना

भारताची ७० टक्के लोकसंख्या खेडेगावात वसलेली आहे. म्हणजेच भारत हा खऱ्या अर्थाने खेड्यात वसलेला देश आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे स्वप्न होते की, खेडी सुधारली तर लोक सुधारतील व खेड्यांचा विकास होईल. खेड्यांचा विकास हाच खऱ्या अर्थाने राष्ट्राचा विकास व प्रगती होय.

विकसित देशांच्या रांगेत यायला भारत अजूनही मागे आहे. येथील ग्रामीण भागाची स्थिती अजूनही पाहिजे त्या प्रमाणात विकसित झाली नाही. ग्रामीण विकासासाठी जिल्हा परिषदेमार्फत विविध योजना राबविल्या जातात. ह्या योजनांमुळे ग्रामीण विकास होणे अपेक्षित आहे. त्याला चालना मिळाली का? ज्या अर्थी भारताने लोकशाही राज्य पद्धतीचा अंगीकार केला आहे त्या अर्थी शासन व प्रशासनात मोठ्या प्रमाणात जनतेचा सहभाग असणे अभिप्रेत आहे. सत्तेच्या विकेंद्रीकरणाच्या दृष्टीने पंचायत राज संस्थेत लोकांचा सहभाग अतिशय महत्वाचा आहे. लोक सहभागाशिवाय विकास शक्य नाही, हे स्वतंत्र भारताच्या पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या मूल्यमापनातून स्पष्ट झाले आहे. तेव्हा पंचायत राज व्यवस्थेत लोक सहभागाचा देखील आढावा घेणे गरजेचे आहे. सत्तेच्या विकेंद्रीकरणासाठी पंचायत राज पद्धत आपण स्वीकारली आहे. ह्या पद्धतीमुळे सत्तेचे विकेंद्रीकरण होणे अपेक्षित आहे. नियोजनात व निर्णय प्रक्रियेत स्थानिक लोक व लोकप्रतिनिधींचा सहभाग असायला पाहिजे. तो कितपत असतो आणि त्यामुळे लोकांना त्यांचे गरजेनुसार कामे निवडण्याचे स्वातंत्र्य मिळाले का? जिल्हा परिषदेच्या कामकाजात आलेली पारदर्शकता, गुणवत्ता व गतीमानता याचे मूल्यमापन होणे आवश्यक वाटते. पंचायत राज संस्थांच्या कार्याला चालना मिळण्यासाठी शासनाचे योगदान व या संस्थांच्या सक्षमीकरणासाठी शासनाचे प्रयत्न याचाही आढावा तेवढाच महत्वाचा आहे. शासनाने काही अधिकार व निधी स्थानिक लोकांच्या हवाली करून विकासकामांची जबाबदारी स्थानिक लोकांवर सोपविली आहे. त्यामुळे विकासाचे कार्यक्रम हे लोकांचेच आहेत, अशी भावना लोकांमध्ये निर्माण होणे अपेक्षित आहे. लोकशाही मजबूत होण्यासाठी ह्याचा देखील शोध घेणे तितकेच महत्वाचे आहे.

**सारणी १:'पंचायत राज' मुळे महिला सशक्तीकरण झाले, तिचे प्रश्न सुटले, असे वाटण्यासंबंधी अध्ययन क्षेत्रातील उत्तरदात्यांच्या प्रतिक्रिया**

| | लोकप्रतिनिधींची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ३३ | ३८.८ |
| अंशत: होय | ३६ | ४२.४ |
| नही | १४ | १६.५ |
| सांगता येत नाही | २ | २.४ |
| **एकूण** | **८५** | **१००.०** |

वरील सारणी क्र. १ मध्ये 'पंचायत राज' मुळे महिला सशक्तीकरण झाले, तिचे प्रश्न सुटले, असे वाटण्यासंबंधी अध्ययन क्षेत्रातील उत्तरदात्यांच्या प्रतिक्रिया दर्शविण्यात आल्या आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार ३८.८ टक्के उत्तरदात्यांना 'पंचायत राज' मुळे महिला सशक्तीकरण झाले, तिचे प्रश्न सुटले, असे वाटत असून ४२.४ टक्के उत्तरदात्यांना 'पंचायत राज' मुळे महिला सशक्तीकरण झाले, तिचे प्रश्न सुटले, असे अंशत वाटत असल्याचे आढळले. त्याचप्रमाणे १६.५ टक्के उत्तरदात्यांना 'पंचायत राज' मुळे महिला सशक्तीकरण झाले, तिचे प्रश्न सुटले, असे वाटत नसून वरील विधानासंबंधी सांगता येत नाही हे नमूद करणाऱ्या उत्तरदात्यांचे शेकडा प्रमाण केवळ २.४ टक्के असल्याचे निदर्शनास आले.

**सारणी २:'पंचायत राज' मुळे महिला सशक्तीकरण झाले, तिचे प्रश्न सुटले, असे वाटण्यासंबंधी अध्ययन क्षेत्रातील उत्तरदात्यांच्या प्रतिक्रिया**

| | अधिकाऱ्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | १० | २०.० |
| अंशत: होय | ३४ | ६८.० |
| नाही | ६ | १२.० |
| सांगता येत नाही | — | — |
| **एकूण** | **५०** | **१००.०** |

वरील सारणी क्र. २ मध्ये 'पंचायत राज' मुळे महिला सशक्तीकरण झाले, तिचे प्रश्न सुटले, असे वाटण्यासंबंधी अध्ययन क्षेत्रातील उत्तरदात्यांच्या प्रतिक्रिया दर्शविण्यात आल्या आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार २० टक्के उत्तरदात्यांना 'पंचायत राज' मुळे महिला सशक्तीकरण झाले, तिचे प्रश्न सुटले, असे वाटत असून ६८ टक्के उत्तरदात्यांना 'पंचायत राज' मुळे महिला सशक्तीकरण झाले, तिचे प्रश्न सुटले, असे अंशत वाटत असल्याचे आढळले. त्याचप्रमाणे १२ टक्के उत्तरदात्यांना 'पंचायत राज' मुळे महिला सशक्तीकरण झाले, तिचे प्रश्न सुटले, असे वाटत नसल्याचे निदर्शनास आले.

**सारणी ३:'पंचायत राज' मुळे महिला सशक्तीकरण झाले, तिचे प्रश्न सुटले, असे वाटण्यासंबंधी अध्ययन क्षेत्रातील उत्तरदात्यांच्या प्रतिक्रिया**

| | कर्मचाऱ्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | २८ | २८.० |
| अंशत: होय | ५९ | ५९.० |
| नाही | १२ | १२.० |
| सांगता येत नाही | १ | १.० |
| **एकूण** | **१००** | **१००.०** |

वरील सारणी क्र. ३ मध्ये 'पंचायत राज' मुळे महिला सशक्तीकरण झाले, तिचे प्रश्न सुटले, असे वाटण्यासंबंधी अध्ययन क्षेत्रातील उत्तरदात्यांच्या प्रतिक्रिया दर्शविण्यात आल्या आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनुसार २८ टक्के उत्तरदात्यांना 'पंचायत राज' मुळे महिला सशक्तीकरण झाले, तिचे प्रश्न सुटले, असे वाटत असून ५९ टक्के उत्तरदात्यांना 'पंचायत राज' मुळे महिला

सशक्तीकरण झाले, तिचे प्रश्न सुटले, असे अंशत वाटत असल्याचे आढळले. त्याचप्रमाणे १२ टक्के उत्तरदात्यांना 'पंचायत राज' मुळे महिला सशक्तीकरण झाले, तिचे प्रश्न सुटले, असे वाटत नसून वरील विधानासंबंधी 'सांगता येत नाही' हे नमूद करणाऱ्या उत्तरदात्यांचे शेकडा प्रमाण १ टक्के असल्याचे निदर्शनास आले.

## निष्कर्ष

- प्राप्त परिणामांच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे हा निष्कर्ष काढण्यात येतो की, अध्ययन क्षेत्रातील बहुतांश लोकप्रतिनिधींना 'पंचायत राज'मुळे महिला सशक्तीकरण झाले, तिचे प्रश्न सुटले, असे अंशत: वाटते.
- प्राप्त परिणामांच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे हा निष्कर्ष काढण्यात येतो की, अध्ययन क्षेत्रातील बहुतांश अधिकाऱ्यांना 'पंचायत राज' मुळे महिला सशक्तीकरण झाले, तिचे प्रश्न सुटले, असे अंशत: वाटते.
- प्राप्त परिणामांच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे हा निष्कर्ष काढण्यात येतो की, अध्ययन क्षेत्रातील बहुतांश कर्मचाऱ्यांना 'पंचायत राज' मुळे महिला सशक्तीकरण झाले, तिचे प्रश्न सुटले, असे अंशत: वाटते.
- प्राप्त परिणामांच्या सांख्यिकीय विश्लेषणाच्या आधारे हा निष्कर्ष काढण्यात येतो की, अध्ययन क्षेत्रातील बहुतांश लाभार्थ्यांना 'पंचायत राज' मुळे महिला सशक्तीकरण झाले, तिचे प्रश्न सुटले, असे अंशत: वाटते

## संदर्भ ग्रंथसूची


१. डॉ. हरिशचंद्र शर्मा, भारतमे स्थानीय प्रशासन, कॉलेज बुक डेपो, जयपूर, पृ.क्र.१५.
२. पंडित जवाहरलाल नेहरू; अनुवाद: साने गुरूजी, ना. वि. करंदीकर, भारताचा शोध, कॉन्टीनेंटल प्रकाशन, पुणे ३३४ ते ३३६.
३. पंचायत राज समिती रिपोर्ट, भारत सरकार, नई दिल्ली १९७८. कृषि व सिंचाई मंत्रालय, ग्राम विकास विभाग भारत सरकार, १९७८. पृ.क्र. ६.
४. राजाराम: लोकशाहीची नवी क्षितीजे, पुणे सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे. १९७०.
५. गुरूनाथ नडगोंडे : ग्रामीण समाजशास्त्र, कांटिनेंटल प्रकाशन, पुणे. १९७६.
६. डॉ. नीलम गोऱ्हे : पंचायतराज मार्गदर्शक, स्त्री आधार केंद्र, पुणे. १९९८.
७. ग्राम विकास विभाग : ग्राम विकासाची दिशा आणि पंचायत राज प्रशासन, राज्य कृती आराखडा, ग्राम विकास विभाग महाराष्ट्र शासन, मुंबई.
८. यशदा, पुणे : विकास आणि पंचायतराज
९. यशदा, पुणे : पंचायतराज आणि रोजगार.
१०. यशदा, पुणे : विकेंद्रित नियोजन.
११. यशदा, पुणे : आधुनिक व्यवस्थापनाची तंत्रे आणि पंचायतराज प्रशासन.
१२. पेंडसे खु. चि. : भारताच्या विकासाची वाटचाल, प्रकाशक लक्ष्मीबाई खुशालराव पेंडसे, नागपूर १९८४.
१३. डॉ. रामशरण शर्मा : प्राचीन भारतीय राजकीय विचार आणि संस्था (मराठी अनूवाद – डॉ. पंढरीनाथ रानडे–डायमंड पब्लीकेशन्स पूणे) प्रथम आवृत्ती, २००६.
१४. प्रो. आर. पी. जोशी : मानव अधिकार एवं कर्तव्य, अभिनव प्रकाशन, अजमेर, प्रथम आवृत्ती, २००८.
१५. डॉ पदमाकर दुभाषी : आजची आपली लोकशाही. प्रकाशक– दामोदर कुळकर्णी, श्री विद्या प्रकाशन पुणे.
१६. प्रा. व्ही. बी. पाटील : महाराष्ट्रातील पंचायत राज व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था Ksagar प्रकाशन, पुणे. तृतिया आवृत्ती २००८.
१७. बाबूराव धारवाडे : ग्रामपंचायत ऑडिट मार्गदर्शक, जनसारथी प्रकाशन कोल्हापूर. १९९९,२०००.
१८. शरदचंद्र गोखले : सामाजिक विकासाचे प्रश्न व धोरण, व्हिनस प्रकाशन, पूणे. १९८९.
१९. प्रा. पी.के. कुळकर्णी : सामान्य समाजशास्त्र, मंगेश प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ति, २०००.